# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–२६/०९/२०१६

**१)मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक २२+२३/०९/२०१६ चे रात्र दरम्यान. यातील फिर्यादी राजेश मोरेश्वर हाडगे वय ३७ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड ठाणा याची युनीकॉन होंडा मोटार सायकल एमएच ३६ बी ६९६७ लाल रंगाची कि. १५,०००/–रु. ची घरासमोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन पेट्रोल पंप ठाणा येथुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) कार चालकाने बैल बंडीला मागेहुन धडक दिल्याने बंडी चालक व बैल जखमी. :–**

दिनांक २४/०९/२०१६ रोजी २०.३० वा. ते २१.०० वा. दर. यातील फिर्यादी मारोतराव गोविंदा नागोसे वय ६१ वर्ष, रा. आंधळगाव हा मौजा कांद्री बाजार येथुन बैलबंडीने व्यापाराचा माल घेवुन कांद्री ते जाम मार्गे परत येत असता मागेहुन येना–या आरोपी व्हॅगनर कारचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन बैलबंडीला मागेहुन मौजा कांद्री ते खैरलांजी बसस्टॉपचे मध्य भागी डांबरी रोडवर येथे धडक देवुन फिर्यादीस व त्याचे बैलास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भगत पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**३) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक महीला जखमी . :–**

दिनांक २५/०९/२०१६ रोजी १९.३० वा. दर. यातील जखमी फिर्यादी ही जवारे यांचे कडे स्वयंपाक करण्याकरीता पायी जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस कॅनरा बॅक समोर जि. प. चौक ते राजीव गांधी चौक रोडवर भंडारा येथे धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी सौ. अनीता दिपक मेंद्रे वय ४२ वर्ष, रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गायकवाड पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकांच्या हयगयीने व निष्काळजीपणामुळे, एक जखमी . :–**

दिनांक २५/०९/२०१६ रोजी १५.२० वा. दर. यातील जखमी शरद पतीराम कमाने वय ६० वर्ष, रा. पिपंळगाव सडक हा ग्रीन बार मुडीपार सडक समोरील लाखनी ते साकोली जाणा–या एन.एच ६ रोड वर उभा असतांना यातील अज्ञात आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन जखमीस मुडीपार सडक एन. एच ६ रोड ग्रीन बारचे समोर लाखनी ते साकोली कडे जानारा रोड येथे धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व पो.स्टे ला कोणीतीही सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १३४(२)मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. रामटेके पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) **अवैध दारु अडयांवर धाडी .** :–

दिनांक २५/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. पवनी व अडयाळ येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०८ लिटर हात भट्टी दारू कि. ८००/–रू. तसेच ४४ लिटर देशी १०० मिली देशी दारू कि. १२,२५०/–रू. असा एकुण १३,०५०/–रू. चा माल जप्त करण्यात आला

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

२६/९/१६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.